सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

मार्च-२०२२ वर्ष -३, अंक-५

कार्यालय - संत एकनाथनगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी,, पुणे - ४११०३७

## रौप्य महोत्सवी वर्ष कार्यक्रम

**सेवक संघाच्या ग २५ वर्षाच्या कामाच्या यशस्वी व दमदार वाटचालीच्या सोहळा म्हणजे पुणे** रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन होते.

२८ जानेवारी १९९७ राजी स्थापित केलेल्या सेवानिवृत्त वन कर्मचारी (सेवक) संघ महाराष्ट्रने, यंदा नुकतीच २५ वर्ष पूर्ण केलीत. त्यानिमित्ताने रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन वन भवन, पुणे येथे जागतिक वन दिनी -२१ मार्च २२ रोजी आणि शिवजयंतीचे मुहुर्तावर सर्वश्री. शिरीष अस्थाना, अध्यक्ष सेवक,संघ, एम.एम. कुलकर्णी कार्यकारी अध्यक्ष सेवक संघ, यांचे मार्गदर्शनाखाली व विवेक डावरे, सचिव,उमेश धोपेश्वरकर, कोषाध्यक्ष यांचे कुशल नियोजनात करण्यात आले होते.

या कार्यक्रमास श्री. मो. ह. खेडकर सेनि प्रमुवसं हे प्रमुख पाहुणे व श्री. एन. आर. प्रविण, मुख्य वन संरक्षक (प्रादे) पुणे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्याव्यतिरिक्त अनेक सेवानिवृत्त व कार्यरत वन अधिकारी, सेवक संघ सदस्य उपस्थित होते. श्री.ए. एन. बल्लाळ, डॉ.एस. एच. पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र जैवविविधता मंडळ, डॉ.ए.के. झा, श्री. शैलेंद्र बहादूर, डी.पी.साने, वि. त्र्यं. पत्की, एम.एम. कुलकर्णी, टी. बी. बिरदवडे यांचा नामोल्लेख करणे आवश्यक आहे. कार्यरत वन अधिका-यात सर्वश्री एन.एस. लडकत, वन संरक्षक कार्य आयोजना, पुणे, विठ्ठल सूर्यवंशी, उप वन संरक्षक कार्य आयोजना, पुणे, चंद्रकांत धुमाळ, उप वन संरक्षक रामदास पुजारी विवअ सहभागी होते.

ज्यांना रौप्य महोत्सवी कार्यक्रमात समक्ष हजर राहता येणे शक्य नव्हते त्यांच्यासाठी प्रमुवसं म.रा.नागपूर, कार्यालयाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. त्याचा लाभ घेवून सर्वश्री विश्वास सावरकर, वसंत जोशी, गिरीश वसिष्ठ उपस्थित होते.

श्री.खेडकर व इतर मान्यवरांच्या हस्ते रौप्य महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन देखील करण्यात आले.




सेवक संघाचे संघटन कामात, वाटचालीत उत्कर्षात व कामकाजात काही आजी-माजी सदस्य आणि कार्यरत पदाधिकारी यांनी विशेष योगदान दिले त्यांचा स्मृतिचिन्ह प्रदान करून विशेष सत्कार करण्यात आला. ते सत्कारमूर्ती खालीलप्रमाणे.

१) वाय. जी. जाधव,
२) ए.आर. मसलेकर,
३) व्ही. एस. जोशी,
४) एम. एच. खेडकर,
५) ए. एच. चांदेकर,
६) एस.के. काळे,
७) विश्वास सावरकर
८) शिरीष अस्थाना,
९) व्ही. टी. पत्की,
१०) अशोक जुन्नरकर,
११) एस.के. गवळी,
१२) एस. एम. जगताप,
१३) जितेंद्र रामगावकर,
१४) संजीव गौर,
१५) जी.के अनारसे,
१६) एम.जी. गोगटे
१७) हेमंत ठाणेदार



सेवक संघाचे रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची छायाचित्रे













रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचे संचालन श्री. विवेक डावरे सचिव व उमेश धोपेश्वरकर यांनी केले. श्री. प्रकाश कुकडोलकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमासाठी सर्वश्री. शिरीष अस्थाना, वि. त्र्यं. पत्की, एम.एम. कुलकर्णी, टी. बी. बिरदवडे यांनी अनेक महिन्यापासून बैठका घेऊन सूक्ष्म नियोजन केले होते. या कार्यक्रमाच्या नियोजनकामी वयाच्या नव्वदीनंतरही श्री. वसंत जोशी यांचे सतत उपयुक्त सल्ले व सूचना लाभल्या.

पुणे वन विभागाने कॉन्फरन्स हॉल, व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांचा ऋण निर्देश करणे आवश्यक ठरते.त्यांना सर्व सेवक सदस्यांकडून मनापासून धन्यवाद








वृत्त विशेष . . . .

* दि. 21 मार्च 2022 रोजी सर्व साधारण सभेच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्य तिथी होती तेंव्हा त्यांचे मान्यवरांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहिली.





दि. 21 मार्च 2022 रोजी सर्वसाधारण सभेच्या वेळी प्रमुख अतिथी श्री. मो. ह. खेडकर सेनि प्रमुवसं यांच्या हस्ते वन भवन परिसरात समोर बकुळाचे रोप लावण्यात आले.





## 25 वी वार्षिक सर्वसाधारण पुणे येथे संपन्न

दिनांक 21 मार्च 2022 रोजी सेवक संघ,महाराष्ट्रची सन 2020- 21 साठीची 25 वी वार्षिक सर्वसाधारण सभा कॉन्फरन्स हॉल, वन भवन, गोखले नगर, भांबुर्डा, पुणे येथे संपन्न झाली. सदर सभेस ५० सदस्य उपस्थित होते. तिची कार्यसूची खालीलप्रमाणे होती

(1) सदस्यांचे नाव नोंदणी व उपस्थित सदस्यांचे स्वागत करणे

(2) सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्षांची निवड करणे.

(3) दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहणे.

(4)अध्यक्ष, सेवक संघ यांचे स्वागतपर भाषण व अहवाल वाचन करणे.

(5)24 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन व त्यास मंजुरी देणे

(6) सन 2020- 21 च्या वार्षिक लेखा व खर्चाच्या ताळेबंदाचे सादरीकरण व त्यास सभासदांची मान्यता देणे.

(7) सन 2022-23 साठी वार्षिक लेखाचे कामी नवीन सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे

(8) सन 2020-21 मध्ये राबविण्यात आलेल्या विविध प्रकल्पांबद्दल सादरीकरण व भविष्यात करावयाच्या कामाचे नियोजन - वृत्त वार आढावा सादर करणे

(9) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय

(10) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षांचे भाषण

(11) आभार प्रदर्शन

### कार्यशाळेत मार्गदर्शन

श्री संजय जगताप यांनी दि.२५-३-२२ रोजी महालेखाकार नागपूर येथील लेखा परीक्षण अधिकारी यांचेकरीता आयोजित रोपवन मुल्यांकन विषयी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

### लेख मालिका

जानेवारी २०२२ अंकापासून "सेवक संघाचे सेवेकरी " ही नवी लेख मालिका सुरू करणेत आली आहे. यात सेवक संघाचे जडणघडणीत गेल्या २५ वर्षात ज्या सदस्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांच्या कामाबाबत ओळख करून देण्यात येत आहे.

त्याअंतर्गत भाग -२

"सेवक संघाचे सेवेकरी "

### श्री वसंत जोशी - एक सेवक संघ इतिहास पुरूष

निदान वनविभागात तरी कुठेही तुलना नाही हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. सेवक संघात अनेक वरिष्ठ वन अधिकारी कार्यरत राहिले आहेत. गेल्या पंचवीस वर्षात देखील अनेक वरिष्ठ वनधिकाऱ्यांनी सेवक संघाच्या विविध पदांवर कार्य करून सेवक संघ वाटचाल सतत चालू ठेवली आहे. सेवक संघात अनेक वरिष्ठ व कनिष्ठ वनाधिकारी येत राहिले, जात राहिले, त्यानुसार संघ चालत राहिला. परंतु संघ स्थापनेपासून रौप्य महोत्सव वर्षाच्या पूर्वसंध्येपर्यंत वसंत जोशी हे सतत सहभागी असणारे एकमेव इतिहास पुरूष ठरले आहेत. वयाच्या ८५ व्या वर्षी आरोग्य व वार्धक्याच्या बंधनामुळे त्यांनी मोठ्या जड अंतकरणाने सेवक संघाच्या कामापासून स्वतःला वेगळे करून घेतले आहे. तथापि मार्गदर्शन इतरांना सतत करण्याचे व सामाजिक माध्यमाच्या मार्फत मार्गदर्शन करण्याचे आश्वासित केले आहे. वसंत जोशी यांनी सेवक संघाच्या वैधानिक कामाच्या बाबतीत अतिशय बारकाईने सचोटीने व आत्मीयतेने ज्या ज्या काही गोष्टी करावयाच्या होत्या, त्या करून सेवक संघाचे आर्थिक व्यवहार व वैधानिक अभिलेख अतिशय परिपूर्ण व निष्कलंक स्वरूपात ठेवले आहेत. ही बाब संघाच्या वाटचालीतील अतिशय अभिमानास्पद कामगिरी आहे असे नमूद करणे मी अत्यावश्यक समजतो.

कोरोना संसर्ग रोगाच्या कालावधीत म्हणजे गेल्या दीड-दोन वर्षामध्ये प्रवास, सभा अशा अनेक गोष्टीवर बंधने आल्यामुळे संघाच्या केंद्रीय कार्यकारी समितीच्या सभा या आभाशी पद्धतीने होत गेल्या. या सभांचे स्वरूप आभाशी असल्याने त्या संबंधात कामकाज गुगल मीट व झूम या समाज माध्यमांव्दारे करण्यात येत होती व त्याद्वारे सर्व सदस्य चर्चा घडून येत असत. सेवक संघाच्या मासिक सभांमध्ये जो काही अजेंडा असे त्यावर त्यांचे बारीक लक्ष असे व त्यातील काही मुद्दा सुटला त्या मुद्द्यावर ते वेगळ्याने चर्चा घडवून आणत. त्यावेळी या आभाशी सभा कटाक्षाने वेळेवर व परिपूर्णरित्या होऊन त्यातील प्रत्येकजण त्याच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा होईल, सर्व सदस्यांना त्या चर्चेचे इतिवृत्त वेळीच मिळण्यासाठी गटावर प्रकाशित केले जाईल याबाबत वसंत जोशी अतिशय दक्ष असत. त्यातून त्यांची सेवक संघाच्या कामाप्रती जी बांधिलकी दिसली तो एक इतिहास घडून आला.

त्याव्यतिरिक्त सेवक संघाने जी मुल्यांकन करणे, समंत्रकीय अहवाल बनविणे, अशी अनेक कामे या घेण्यात आली, त्या बदल्यात विविध कार्यालयाकडून जे शुल्क

मिळत गेले त्यासंबंधीचे हिशोब, त्यावरील कराचा भरणा व मानधनाचे वेळेवर होऊन सर्व सहभागींना कामाचे शुल्क व प्रवास खर्च वेळेवर मिळण्याकडे ते सतत लक्ष देऊन असत. सेवक संघाने जे चार्टर्ड अकाउंटंट नियुक्त केले आहेत त्यांच्याकडे सेवक संघाच्या सर्व वृत्त स्तरावरील शाखा आपले मासिक खर्चाचे लेखे वेळेवर पाठवतील याबाबत जागरूकतेने पाठपुरावा करत असत. सेवक संघाप्रती समर्पणाचा आदर्श त्यांनी स्वतःच्या वर्तणुकीतून घालून दिला. महिना संपताच पहिल्या तारखेला पुणे शाखेचा रोख लेखा ते या वयात देखील चार्टर्ड अकाउंटंट यांच्याकडे पाठवून सर्व वृत्त स्तरीय शाखांना त्याबाबत स्मरण करून देत. त्यांचीही बांधीलकी आणि सेवक संघाच्या कामाप्रती निष्ठा व सेवाभावी वृत्ती होती तिला तोड नाही. सेवक संघाच्या कामाचा म्हणजेच वन विभागाला वेगवेगळ्या तांत्रिक सेवा देण्यासाठी अनेक सेवा निवृत्त अधिकाऱ्यांनी नाशिक नागपूर धुळे येथे गेल्या ५-७ वर्षात संस्था स्थापन केल्या, त्या चालवण्याचा देखील प्रयत्न केला, परंतु या संस्था यशस्वी झाल्याचे कुठे दिसले नाही.

महाराष्ट्र वन विभागात सेवक संघाच्या कामाची तंत्रकुशलता, कार्यपद्धती, आणि पारदर्शकता नेहमीच स्पष्ट, शुध्दत्तम, गुणवत्तापूर्ण ठरल्याने सेवक संघाने स्वताचा एक ब्रँड निर्माण केला आहे आणि यामागचे सुत्रधार वसंत जोशीं होते. वसंत जोशींनी नुकतीच सेवक संघाचे विश्वस्त पदाभारातून स्वेच्छेने कार्यमुक्ती घेतली असली तरी वसंत जोशींना विसरणे अशक्य आहे.


सेवक संघाचे पंचवीस वर्षापूर्वी लावलेल्या इवलेशा रोपाचा वेलू आज गगनाकडे झेपावताना त्याचे पैतृक नात्याने पालकत्व करण्यात वसंत जोशींचा वाटा फार मोठा होता, हे सेवक संघाचे इतिहासात नमूद राहीन. सेवक संघाचे कार्याच्या लाटेला गतिमान करण्याचे काम वसंत जोशीं या प्रसंग पुरुष सतत केले आहे व हा वारसा सुवर्ण महोत्सवाकडे होणाऱ्या वाटचालीसाठी दिपस्तंभ आहे. त्यांना उत्तम आरोग्य व दिर्घायुष्य लाभो ही भगवान कृष्णाचरणी प्रार्थना.

---

जागतिक चिमणी दिनाच्या शुभेच्छा





जागतिक वन दिनाच्या शुभेच्छा











जागतिक वन्सजीव दिनाच्या शुभेच्छा




केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी